क्र.रा.मं./सा.आ./परि./काम./रा.उ.शु./नोट/४५२

राज्यमंत्री
सार्वजनिक आरोग्य, कामगार
परिवहन व राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 8 SEP 2016

श्री. राजू राठी, अध्यक्ष सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचे माळढोक पक्षी अभयारण्य इको सेन्सेटीव्ह झोन रद्द होऊन उद्योगवाढीतील अडसर दूर होणेबाबतचे स्वयंस्पष्ट निवेदन सोबत जोडले आहे.

सोलापूर येथील माळढोकपक्षी अभयारण्यामुळे सोलापूरचा उद्योग विकास खुंटलेला आहे. सदर क्षेत्राला पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Echo Sensitive Zone) असे जाहीर केल्यामुळे सोलापूरच्या उद्योग विकासाला अडसर निर्माण झाला असून सदर इको सेन्सेटीव्ह झोनची अट शिथिल करण्यात यावी जेणेकरून नवीन उद्योग लवकरात लवकर सुरू करण्यास मदत होईल व जिल्ह्यातील बेरोजगार तरूण वर्गाला मोठ्या प्रमाणात नोकरीची संधी उपलब्ध होईल. तरी सोलापूरच्या उद्योगवाढीस चालना मिळण्यासाठी औद्योगिक क्षेत्रापुरते इको सेन्सेटीव्ह झोन रद्द व्हावे असे उक्त निवेदनात नमूद केले आहे

सबब, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने औद्योगिक क्षेत्रापुरती इको सेन्सेटीव्ह झोनची अट शिथिल करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधितांना उचित निदेश द्यावेत, अशी विनंती आहे.

आदरपूर्वक.

(विजय देशमुख)

**मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक 8-9-2016